P.R.O Office ,Crime Branch ,Pimpri Chinchwad
Address:- Office Of The Commissioner Of Police ,
Premlok Park Chinchwad,
Maharashtra - 411033

**प्रेसनोट** **दिनांक – १५/११/२०२४**

**दि. १४/११/२०२४ रोजी रात्रौ ००.०० वा ते २४.०० वा पर्यत दाखल गुन्हे**

**भाग १ ते ५ चे गुन्हे**

०१.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | तळेगाव एमआयडीसी २५९/२०२४ भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १०३(१),६१(२),२३८,३(५) |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.२६/१०/२०२४ रोजी २२/४० वा चे सुमारास नानोली ता.मावळ जि. पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि.१४/११/२०२४ रोजी १५.२३ वा |
| फिर्यादी | :- | शाम तुकाराम मस्के,वय ४५ वर्षे, व्यवसाय नोकरी,सहा.पोलीस निरीक्षक,तळेगाव एमआयडीसी पोलीस स्टेशन, |
| आरोपी | :- | १)महिला फिर्यादी, वय ४० वर्षे, रा.ब्राम्हणवाडी, ता.मावळ, जि.पुणे<br>२)मंगेश गोविंद दाभाडे, वय ३६ वर्षे,रा.कोटेश्वरवाडी, ता.मावळ, जि.पुणे<br>३)तनेष साईनाथ दाभाडे, वय १९ वर्षे, रा.कोटेश्वरवाडी, ता.मावळ, जि.पुणे<br>**आरोपी अटक आहेत.** |
| तपशिल | :- | नमुद ता वेळी ठिकाणी मयत इसम सोमनाथ रघुनाथ काळे, वय ३६ वर्षे, रा.नानोली, ता.मावळ जि.पुणे हा दारु पिऊन येवुन आपल्या आई - वडिलांना त्रास देतो या कारणाने आ.क्र.१ हिने चिडुन मयताचा खुन करण्याच्या इरायाने आपला मावस भाऊ आ.क्र.२ व आ.क्र.३ यांस दि.२६/१०/२०२४ रोजी नानोली ता.मावळ जि. पुणे गावी मयताचे रहाते घरी बोलावुन घेवुन आरोपी मजकुर यांनी संगणमत करुन मयत याचा खुन करण्याचा फौजदारीपात्र कट करुन मयत दारुचे नशेत असल्याचा गैरफायदा घेवुन आ.क्र.२ व ३ यांचे मदतीने मयत यांचा पायाने गळा दाबुन खुन केला, तसेच मयत हा दारुचे नशेत मयत झाला असल्याचा बनाव करुन मयताचे प्रेताची परस्पर विल्हेवाट लावुन पुरावा नष्ट केला आहे,म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | वपोनि रणजित जाधव ८६०५१२१५५५ |

०२.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | दापोडी ७४९/२०२४ भारतिय न्याय संहिता कलम १०९, ३५२, ३५१(२), भारतीय हत्यार कायदा ४, २५ आणि फौजदारी सुधारणा कायदा कलम ३ व ७ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.१३/११/२०२४ रोजी १५.००ते १५.१५ वा चे दरम्यान आई गार्डन ते सांगवी कडे जाणारा सार्वजनिक रोडवर असतांना गणेश हॅरीटेज या बील्डींगचे जवळ पुणे येथे |
| गुन्हा दाखल | :- | दि.१४/११/२०२४ रोजी ०१.५८ वा |
| फिर्यादी | :- | आनंद वसंत कांबळे, वय ३१ वर्षे रा.अविनाश अपार्टमेंट संगम नगर,फ्लॅट नं ०९ ,जुनी सांगवी , सुरभी चव्हाण यांचे घरी भाडयाने, पो.ठाणे सांगवी,पिंपरी चिंचवड, |
| आरोपी | :- | मोसीन बाबु सय्यद वय ३० वर्षे राहणार वार्डनं ३ जयभीम नगर, पाटील गीरणी जवळ,दापोडी,पुणे<br>**आरोपी अटक आहे** |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादी व त्यांचा मित्र सनि मुदलीयार याचे सोबत पायदळ आई गार्डन कडुन सांगवी कडे जात असतांना फिर्यादी समोर अचानक नमुद आरोपी हा आला व फिर्यादीस म्हटला कि, ‘काय रे आई घाल्या तुला काय सांगीतले होते कि, दापोडीत यायचे नाही,तरी तु तुझी आई ईकडे का घातली ?‘ यावर फिर्यादी हे आरोपीस म्हटले कि, ‘ भाउ मी तर आई गार्डन ला माझ्या मित्रांना भेटायला आलो होतो. आता माझ्या घरी जात आहे, दापोडी सर्वांची आहे.‘ असे बोलल्यावर आरोपीस राग आला व आरोपीने फिर्यादीस घाण घाण शिवीगाळ करत कानाखाली लगावली व लगेच त्याचे जवळील लोखंडी धारदार हत्यार काढले व फिर्यादीचे मानेवर जोराने मारायला फिरवला असता फिर्यादीने मान मागे केली त्यामुळे आरोपीचा वार हुकला .त्यावर फिर्यादी आरोपीस भाउ अस नको करु भाउ अस नको करु असे म्हणत असतांना आरोपीने पुन्हा त्याचे हातातील लोखंडी हत्यार फिर्यादीचे मानेवर जीवे मारण्याचे उद्देशाने मारायला लागला असता त्यावेळी फिर्यादीने पुन्हा मागे सरकत ते हुकविताना फिर्यादीचे डाव्या हाताने ते हत्यार अडविले असता फिर्यादीला लोखंडी धारदार हत्यार |

डाव्या हाताला मनगटावर लागुन गंभीर दुखापत झाली आहे. फिर्यादी हे ओरडायला लागले व रस्त्यावरील लोकांकडे मदत मागायला लागले असता जमलेल्या लोकांना आरोपी म्हणाला कि, "खबरदार जर कुणी याच्या मदतीला आला, एक-एकाला कापुन टाकेल, मला मोसीन भाई म्हणतात, मी जेल ची हवा खाउन आलो आहे." असे बोलुन तो शिवीगाळ करत होता व फिर्यादीस' खुन्नस देवुन तुला जगु देणार नाहि' असे बोलत होता. त्यानंतर तेथे कोणीतरी पोलीस आले असे ओरडयाने आरोपी याने तेथेच कुठेतरी गवतात त्याचे हातातले लोखंडी मोठया चाकु सारखे दिसणारे हत्यार गवतात फेकुन दिले व तेथुन पळुन गेला म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोउपनि कांबळे ९७६५३९३८४९

०३

पोस्टे व गु रजि.नं. :- चिखली ७१०/२०२४भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ११८(२),१४०(३),११५(२), ३५१(२), ३५२, १८९(२),१९१(२),१९०

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दिनांक १३/११/२०२४ रोजी दुपारी १३/३० वा चे सुमारास बोल्हाईमळा गल्ली नं.२ समोर जाधववाडी चिखली पुणे व नवीन मनपा शाळेजवळ जाधववाडी चिखली पुणे

गुन्हा दाखल :- दि.१४/११/२०२४ रोजी ०१/१७ वा

फिर्यादी :- अमित रमेश मोहिते, वय ३० वर्षे, धंदा - फॅब्रिकेशन रा. फ्लॅट नं.बी- ७०१, गणेशसिध्दी सोसायटी नेवाळे वस्ती चिखली पुणे मो.नं.७०६६६६६५६५ आधारकार्ड नं.७६८७ ९४४१ ११०५

आरोपी :- दिनेश लालचंद यादव, २)निलेश लालचंद यादव, ३)गणेश किसन यादव,४) दिपक घन, ५)संतोष तात्या जाधव, ६) गणेश नंदु मोरे वय ३९ रा दिगंबरा निवास मोरे पाटील चौक कुदळवाडी चिखली पुणे , ७)सोमनाथ यादव ८)स्वराज पिंजन, ९)प्रकाश चौधरी, १०)मनोज मोरे,
११)कुंदन गुप्ता रा. सर्व चिखली पुणे व इतर पाच ते सहा लोक
**आरोपी क्रं ६ अटक आहे**

तपशिल :- नमुद केले तारखेस वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हे कामानिमित्त मित्र गोपाळ कच्छवे असे थांबले असताना तेथे आरोपी क्रं १ हा येवुन फिर्यादीस तुम्ही मौजे चिखली गट नं.७,८,९,१० मधील प्लॉटिंग बाबत एनजीटी कडे दिलेली तक्रार मागे घ्या. तेथे राहणारे लोक माझ्याकडे आले होते.सदरचे लोक हे माझे आहेत. तसेच मी ही सदर गट नंबर मधील उर्वरित निळया व लाल पुर रेषामध्ये प्लॉटिंग करणार आहे त्याचा ही मला त्रास होईल त्यामुळे तुम्ही केस मागे घ्या. तेंव्हा फिर्यादी व मित्र गोपळ यांनी त्यांना आमचा व तुमचा काही संबध नाही. आम्ही कोर्टात त्याबाबत उत्तर देवु असे म्हणाले असता त्यागोष्टीचा राग आरोपीस आल्याने त्यांनी फिर्यादीस व गोपाळ कच्छवे यास वाईट वाईट शिवीगाळ करुन फिर्यादीस हाताने मारहाण करुन तेथे त्याचे इतर साथीदार आरोपी मजकुर यांना बोलावुन घेवुन त्यांनी ही फिर्यादीस लाथाबुक्कांनी काठीने मारहाण करुन फिर्यादीचे डोक्यास, तोंडास पाठीवर जखम करुन त्यांचा एक अर्धा दात तुटला आहे. तसेच गोपाळ कच्छवे यास ही शिवीगाळ करुन मारहाण करुन त्यास गणेश मोरे, दिनेश यादव, मनोज मोरे,गणेश यादव यांनी त्यांच्या काळे रंगाचे फॉच्युनर गाडी नं.५४ या गाडीतुन जबरदस्तीने बसवुन याला जिवे मारुन टाकु अशी धमकी देवुन नवीन मनपा शाळेजवळ जाधववाडी चिखली पुणे येथे घेवुन येवुन तेथेही मारहाण शिवीगाळ केली आहे. म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- सपोनि गोमारे ९९२२७५६८२८

०४.

पोस्टे व गु रजि.नं. :- महाळुंगे एमआयडीसी ७८३ /२०२४ बी एन एस २८१,१२५(अ),१२५(ब),३२४(२) ,मो.वा.का.कलम १८४,१३४(ब) प्रमाणे

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.१३/११/२०२४ रोजी ०८.३० वा.चे सुमारास चाकणते तेळेगाव जाणारे रोडवरखालुंब्रे येथेइंडीयन ऑइल पेट्रोल पंपाचे जवळ ता.खेड जि.पुणे येथे

गुन्हा दाखल :- दि.१४/११/२०२४ रोजी१२.२२ वा.

फिर्यादी :- उत्तम मारुती गाडे वय ४५ वर्षे,शिक्षण १० वी, व्यवसाय शेती ,रा.सदुंब्रे ता.मावळ जि.पुणे

आरोपी :- टेंम्पो गाडीनं. एम.एच.४३/ए.डी.३०२९ वरील चालक (नाव पत्ता माहिती नाही) **आरोपी अटक नाही**

तपशिल :- नमुद तारखेस वेळी व ठिकाणी टेंम्पो गाडीनं. एम.एच.४३/ए.डी ३०२९ वरील चालक (नाव पत्ता माहीत नाही) हा त्याचे ताब्यातील टेम्पो भरधाव वेगात रोडचे परिस्थीतीकडे दुर्लक्ष करुन चालवुल चाकण कडुन तळेगावकडे

जाणारी रिक्षा एम एच.१२/आर.पी.८८५९ हिला जोराची धडक देवुन अपघात केला त्यात रिक्षाचालक अनिल ज्ञानेश्वर गाडे ,वय ४१ वर्षे रा.सदुंब्रे ता.मावळ ,जि.पुणे याचे किरकोळ व गंभिर दुखापतीस तसेच रिक्षाचे नुकसाणीस कारणीभुत झाला व जखमीस उपचाराकरिता घेवुन न जाता पळुन गेला म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोहवा/ ४६७ नवले ९६४४६९६७२३

०५.

पोस्टे व गु रजि.नं. :- तळेगाव एमआयडीसी २६०/२०२४ महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम कलम ६५ (क)(फ) प्रमाणे

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.१४/११/२०२४ रोजी१४/२० वा चे सुमारास तळेगाव एमआयडीसी पोलीस स्टेशनचे हद्दीमध्ये सुधानदीकाठी, सुदूंबरे, ता.मावळ जि.पुणे

गुन्हा दाखल :- दि.१४/११/२०२४ रोजी१९/२३ वा

फिर्यादी :- धनंजय लक्ष्मण भोसले, वय ५२ वर्षे, पोशि / २०१७, गुन्हे शाखा, युनिट ५, पिंपरीचिंचवड

आरोपी :- महिला आरोपी, अंदाजे वय ५६ वर्षे, रा. तळेगाव चाकण रोड, सुदूंबरे, ता.मावळ जि.पुणे
**आरोपी अटक नाही**

तपशिल :- नमुद केले तारीखेस वेळी व ठिकाणी यातील आरोपी हिने १,००,०००/- रु किं चे २००० लिटर गुळ मिश्रीत रसायन व २०००/- रु किं ची एक लोंखडी टाकी भिजत घालताना दिसुन आली व पोलीस आल्याची चाहुल लागताच झाडाझुडपातुन पळुन गेली, म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोहवा / ८६७ भोजणे९६८९००२८६८